दिनांक ०८/०२/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक विठ्ठल केशव धायगुडे, व्यवसाय- वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक- सहायक अभियंता कार्यालय, चिकलठाणा ग्रामीण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद यांनी लाचेची मागणी करून ४५००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव, हुद्दा व पत्ता | :- | विठ्ठल केशव धायगुडे, व्यवसाय- वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक- सहायक अभियंता कार्यालय, चिकलठाणा ग्रामीण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद रा. पोलीस कॉलनी, मील कॉर्नर, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५०००/- रु लाचेची मागणी करून, ४५००/- रुपये स्विकारले. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना नवीन घरासाठी विद्युत मीटर बसवुन देण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, सुंदरवाडी, चिकलठाणा ग्रामीण कार्यालयाचे समोर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांना नवीन घरासाठी विद्युत मीटर बसवुन देण्याकरीता विठ्ठल धायगुडे, वायरमन, एमएसईडीसीएल, चिकलठाणा ग्रामीण, औरंगाबाद यांनी ५०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, विठ्ठल धायगुडे, वायरमन, नेमणुक- सहायक अभियंता कार्यालय, चिकलठाणा ग्रामीण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रुपयाची मागणी करुन, तडजोडी अंती ४५००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, विठ्ठल केशव धायगुडे, व्यवसाय- वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक- सहायक अभियंता कार्यालय, चिकलठाणा ग्रामीण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन ४५००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.